# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा.क्र.तशिविकापु/विवि/२०२०/ 563

**परिपत्रक**

दिनांक :- 29 JAN 2020

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त ,शासकीय,अशासकीय अनुदानित सर्व संस्था.

विषय :- दिनांक ३० जानेवारी,२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस **"हुतात्मा दिन"** म्हणून पाळण्याबाबत..

संदर्भ :- महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक जपती २२२०/ प्र.क्र.५/२९ दिनांक २७ जानेवारी, २०२०

उपरोक्त संदर्भाकिंत विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय,अनुदानित पदवी / पदविका संस्था यांना सुचित करण्यात येते की, दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस "हुतात्मा दिन" म्हणून पाळण्याबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागा यांनी दिनांक २७/०१/२०२० शासन परिपत्रका द्वारे सर्व शासकीय/निमशासकीय संस्थांना सुचित केलेले आहे.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन(स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्या नुसार यावर्षीही गुरुवार दिनांक ३० जानेवारी,२०२० रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस "हुतात्मा दिन" म्हणून पाळण्यात यावा.

मौन (स्तब्धता) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०:५९ पासून ११:०० वाजेपर्यन्त इशारा भोंगा वाजविण्यात येईल सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शासकीय/अशासकीय,अनुदानित कार्यालयामध्ये अधिकारी/कर्मचारी/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी/विद्यार्थी या सर्वांनी दोन मिनिटे मौन(स्तब्धता) पाळावे, सकाळी ठिक ११:०२ मिनिटांनी मौन (स्तब्धता) संपल्यासंबधीचा इशारा भोंगा सकाळी ठिक ११:०३ मिनिटापर्यन्त वाजविण्यात येईल

जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे संस्था प्रमुखानी वरीलप्रमाणे सकाळी ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत कार्यालयामध्ये अधिकारी/कर्मचारी/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी/विद्यार्थी यांना योग्य ते निदेश देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभीरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

29/1/2020

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

सोबत :- संदर्भिय पत्राची छायाप्रत

दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन ( स्तब्धता ) पाळून हा दिवस " हुतात्मा दिन" म्हणून पाळण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : जपुती २२२०/प्र.क्र.५/२९**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ जानेवारी, २०२०

<u>वाचा</u> :- केंद्र शासनाच्या गृह विभागाच्या क्र.२/२/२०२०-Public, दिनांक ०८.०१.२०२० चे पत्र.

<u>प रि प त्र क</u>

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता ) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही गुरुवार,दिनांक ३० जानेवारी,२०२० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता ) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. गुरुवार, दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पाळण्यात यावयाच्या मौन (स्तब्धता ) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यन्त इशारा भोंगा वाजविण्यात येईल. सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/आस्थापना/शैक्षणिक संस्था/विद्यापीठे या मधील अधिकारी/कर्मचारी/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी /विद्यार्थी तसेच नागरिक आदी सर्वांनी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळावे, सकाळी ठिक ११.०२ मिनिटांनी मौन ( स्तब्धता ) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा सकाळी ठिक ११.०३ मिनिटांपर्यन्त वाजविण्यात येईल.

२. जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे वरीलप्रमाणे सकाळी ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभीरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता ) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२००१२७१२५८५२५९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VALVI JANA JIVA

Digitally signed by VALVI JANA JIVA
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=4f7e685e5023c557d59a50fc6a7ce3fcacf9e46a5a0310d4a47b930f7e1c3052c, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=fd6f9785fe220b2c6f30d422d401e2dfc838a0d9ec621401534f5b36eaf57f26, ou=FINANCE DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VALVI JANA JIVA
Date: 2020.01.27 12:59:40 +05'30'

( ज. जि. वळवी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई,
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व मा. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,

विभागीय कार्यालय पुणे. 29 JAN 2020 आवक क्र....619....